# ईशावास्य उपनिषद

माणूस जेव्हा वसाहत करून राहू लागला तेव्हा त्याच्या जीवनाला स्थैर्य लाभले. आणि त्याचबरोबर त्याच्या विचारांना देखील स्थिरता लाभली. रोज बदलणाऱ्या निसर्गाबद्दल त्याच्या मनात गूढ आकर्षण निर्माण झाले. प्रश्न पडू लागले. आणि त्या प्रश्नांची उत्तरे शोधताना त्यातील काही द्रष्ट्या पुरुषांनी चिंतनाचा मार्ग स्वीकारला. अशा सततच्या आणि सखोल चिंतनाने ऋषींचे देहभान हरपले. सूक्ष्म, तरल अवस्था प्राप्त झाली आणि त्या अवस्थेमध्ये झालेले आत्मज्ञान शब्दांमधून प्रगट झाले. मीपणाच्या पलीकडून म्हणजे अतींद्रिय आत्म्याकडून आलेले हे शब्द आहेत. म्हणून त्यांना अपौरुषेय म्हटले आहे.

वेदवाङ्मयाचा एक भाग असणाऱ्या उपनिषदांनाच वेदांत असे दुसरे नाव आहे. आणि हे नाव ईशावास्याला अगदी विशेषत्वाने लागू होते. कारण हे उपनिषद म्हणजे यजुर्वेदाचा अंतिम अध्यायच आहे. शुक्ल यजुर्वेदाच्या काण्वशाखीय संहितेच म्हणजेच वाजसनेय संहितेचा चाळीसावा अध्याय म्हणजे ईशावास्य उपनिषद! यालाच ईशोपनिषद, वाजसनेय किंवा संहिती उपनिषद अशीही नावे आहेत. याच्या आधीच्या ३९ अध्याय कर्मकांडाचे विवेचन आहे. तर या अध्यायात केवळ तत्त्वज्ञान आहे. ईशावास्य हे नाव यातील पहिल्या मंत्रातील पहिल्या शब्दावरून घेतले आहे. सामान्यतः मराठीत आपण उपनिषद हा शब्द नपुसकलिंगी वापरतो परंतु मूळ संस्कृतमध्ये हा शब्द स्त्रीलिंगी आहे. ती उपनिषद असे म्हणतात.

केवळ १८ मंत्र असलेले हे उपनिषद आशयगर्भ आहे. रप्पोऱ्या मोत्यांचा सुघड सर असावा अशी या १८ मंत्रांची उत्कृष्ट जडणघडण यात आहे. सर्व उपनिषदांमध्ये याला प्रथम स्थान आहे. यातील तत्त्वज्ञान हे जीवनाला अभिमुख असे आहे. प्रपंचात राहून, दैनंदिन जीवन उत्कटपणे जगत असताना या सर्व भौतिक पदार्थांना व्यापून असणारे ईश्वरी अधिष्ठान यात ठळकपणे विशद केले आहे. प्रपंचाशी फारकत न घेता सर्व कर्तव्यकर्मे करत असतानाच त्या

© www.madhaveeraghuveer.com

classmate
Date :
Page :

आनंद मिळवता येतो हे महान सूत्र यात सांगितले आहे. आप
ऋषींनी कुठेही उपदेशाचे डोस पाजले नाहीत तर केवळ स्वानुभूति सांगितली आहे. आम्ही असे असे केल्यामुळे आम्हाला हे उत्तम फळ प्राप्त झाले. त्यासाठी हा मार्ग निवडलात तर जे आम्हाला मिळाले ते तुम्हालाही मिळू शकेल असे आश्वास आणि दिलासा दिला आहे.

उपनिषदांचे सार म्हणजे भगवद्गीता! परंतु त्यातही भगवद्गीतेच्या १८ अध्यायातील अनेक सिद्धांताचे बीज या ईशोपनिषदाच्या १८ मंत्रांमध्ये सापडते. यातील पहिल्याच मंत्रातील पहिला शब्द ईशावास्यमिदं सर्वम् । आणि भगवद्गीतेतील वासुदेवः सर्वमिति । यात विलक्षण साम्य आहे. यातील व्यूह व समूह हे शब्द अनुक्रमे विभूतियोग आणि विश्वरूपदर्शन योगाचा स्पष्टपणे निर्देश करतात.

हे लहानसे ईशोपनिषद म्हणजे खरोखर शुद्ध ज्ञानाचे भांडार आहे. यात गुरु-शिष्य संवाद नाही. तर प्रश्न अध्याहृत आहेत आणि गुरुंनी ध्यानातील अत्युच्च पातळी वरून अखिल मानवजातीला संदेश दिला आहे. आणि हे तत्त्वज्ञान नुसते ऐकून भागणार नाही. तर पुन्हा पुन्हा त्याचे मनन-चिंतन करून, आचरणाच्या माध्यमातून आयुष्यात जर का मुरले तर रोजचे जीवन देखील आनंदपूर्ण होईल.

ईशावास्य हे पूर्ण उपनिषद आहे. पारमार्थिक जीवनाचा परिपूर्ण आराखडा यात आहे. हे उपनिषद केवळ दिशा दाखवून थांबत नाही, तर अक्षरशः आपले बोट धरून या सुचारु मार्गावरून आपल्याला शेवटपर्यंत घेऊन जाते. यातील काही मंत्र आकलनासाठी कठीण तर काही सुगम आहेत. तरीही त्यातील अर्थ जाणून घेऊन तो मनाला भावला आणि त्यातील तात्पर्याचा अंगिकार करता आला तरच त्याची अनुभूति येईल. समर्थांच्या भाषेत सांगायचे झाले तर 'समजले आणि वर्तले' असे घडायला हवे.

ईशावास्यमिदं सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत् ।
तेन त्यक्तेन भुञ्जीथाः मा गृधः कस्यस्विद् धनम् ।

या पहिल्याच मंत्रात परब्रह्मवाचक शब्द वापरला आहे तो ईश ! ईश्वर म्हणजे मूर्त ब्रह्म ! या ईशाने हे सर्व जगतातील जग व्यापले आहे. ईश्वर नाही अशी जागा शोधूनही सापडणा नाही. परब्रह्माला स्वतःचा आकार नाही, परंतु सर्व आकार त्याच्यापासूनच निर्माण झाले आहेत. तो या विश्वात घनदाट भरून राहिला असला तरी या विश्वातील उलाढालींनी तो लिप्त होत नाही. सर्वत्र तो आहेच आहे.

असा या पहिल्या दोन चरणांचा अर्थ सहज समजण्या-सारखा आहे, पटण्यासारखा आहे. परंतु त्यामुळे आमच्या सर्व क्रियांवर, हालचालींवर बंधने येऊ शकतात. कारण ईश्वर सर्वत्र आहे असे म्हणताना तो अन्नात, पाण्यात, जमिनीत, वृक्ष वेलीं सगळीकडेच आहे. मग आम्ही जमिनीवर पाय ठेवायचा का न अन्न ग्रहण करायचे नाही का? पाणी प्यावे की नाही? तर त्या उत्तर पुढील चरणात दिले आहे. ऋषी म्हणतात - 'ही विविधरं सृष्टी तुमच्यासाठीच आहे. तिचा तुम्ही जरूर उपभोग घ्या. प कसा? तर त्यागपूर्वक उपभोग घ्या.' या दृश्य विश्वातील प्रत्येक गोष्टीवर, पदार्थावर माझा निश्चित अधिकार आहे. परं माझा एकट्याचा नाही. अखिल मानवजातच नाही तर किडा-मु पशु-पक्षी या सर्वांचा यावर हक्क आहे. त्यामुळे भोग घेताना मी या सर्वांचा विचार करायला हवा. मनुष्य विचारशील आ तेव्हा सर्वांना पुरेसे देऊन जे उरेल त्याचा कृतज्ञतेने स्वीका मी करेन हा विवेक बाळगायलाच हवा. आणि दुसऱ्याच्या धनाचा अपहारही माझ्याकडून होणार नाही. येथे 'धन' या शब्दात अनेक गोष्टी अंतर्भूत आहेत. एखाद्याची विद्या, कला लावण्य, श्रम हे त्या व्यक्तीचे धनच आहे. त्या त्या व्यक्ती परवानगीशिवाय आणि योग्य मोबदला न देता हुबाडणे ही चोरीच आहे. असे तत्त्वज्ञान पहिला मंत्र सांगतो. आणि खरोखर या मंत्राप्रमाणे आचरण ठेवता आले तर आयुष्याला त्यागाचा

©www.madhaveeraghuveer.com

सुगंध लाभेल. आणि खऱ्या अर्थाने जगण्याचा आनंद घेता येईल. आणि असे आनंदी आयुष्य पुरेपूर जगावेसे वाटेल. आणि या पुढचा मंत्र हेच सांगतो.

कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेत् शतं समाः।
एवं त्वयि नान्यथेतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे॥२॥

इहलोकी कर्मे करीतच १०० वर्षे जगण्याची इच्छा करावी. देहधारी व्यक्तीला याशिवाय दुसरा मार्गच नाही. आणि अ जगल्याने मनुष्याला कर्माचा लेप लागत नाही. कर्मबंधना तो अडकत नाही. आयुष्याच्या नाटकामध्ये जी भूमिका वाट्य आली असेल ती समरसून जगावी. जे काम त्या जगन्नियंत्य सोपवले असेल ते जीव ओतून करावे. ते कितीही हीन, क दर्जाचे असले तरी मनापासून करावे आणि कृतकृत्य होऊन जगाचा निरोप घ्यायचा. ही त्या ईश्वराची सेवाच आहे. आणि जन्म मरणाच्या फेऱ्यातून सुटण्याचा हाच मार्ग आहे.

परंतु ज्या अभाग्यांना सृष्टीचे हे चक्र समजत नाह ते देहालाच सर्वस्व मानतात. विषयोपभोगात रमतात आणि आत्म्याकडे दुर्लक्ष करतात. असे लोक शेवटी असुर्या नावाच्या अंधकारमय लोकाला जातात असे ३ऱ्या मंत्रात सांगितले आ तर चवथ्या, पाचव्या मंत्रात त्या आत्मतत्त्वाची वैशिष्ट्ये स्पष्ट केली आहे ते आत्मतत्त्व मुळीच हालचाल न करणारे आणि तरीही अत्यंत वेगवान आहे. धावणाऱ्या इतरांना ते स्वतः नुसते उभे राहूनही मागे टाकते. असे विरोधाभास वाटणारे मंत्र आहेत. गीतेतील १३ व्या अध्यायात आत्म्याचे वर्णन करण श्लोक याच्याशी साधर्म्य दाखवतात. ६ व्या व ७ व्या मंत्रा एकत्वाची अनुभूति घेणाऱ्या योगी पुरुषाचे वर्णन आहे त्याला सर्वत्र त्या ब्रह्मरसाचाच अनुभव येतो त्याला शोक मोह कसला? आणि घृणा तरी कशाची असणार? पुढे आठव्या मंत्रात तर त्या सर्वव्यापी परमतत्त्वाचे वर्णन ११ लक्षणांनी केले आहे. अत्यंत तेजस्वी, ज्ञानमय, देहरहित, स्वयंभू अशा शब्दांमध्ये त्याला गुंफण्याचा प्रयत्न केला आहे.

© www.madhavraghuveer.com

classmate
Date :
Page :

यापुढील ५-६ मंत्रांमध्ये विद्या - अविद्या, संभूति - असंभूति यांचे दाखले देऊन अध्यात्ममार्गावरील सर्वात मोठा अडथळा अहंकाराचा आहे असा धोक्याचा इशाराही दिला आहे. त्याचबरोबर विद्या आणि अविद्येचा संयोग साधून आत्मज्ञानाकडे लक्ष वेधले आहे. संभूति म्हणजे विकास तर असंभूति म्हणजे विनाश असा अर्थ लावला तर संदर्भ स्पष्ट होत जातात.

यानंतर १५ व्या मंत्रात विश्वपोषक अशा प्रभुला प्रार्थना केली आहे. सुवर्णमय पात्राने सत्याचे मुख झाकले आहे. आणि सत्याचा उपासक असणाऱ्या माझ्यासाठी ते दूर कर अशी विनवणी केली आहे. हिरण्मय पात्र हा शब्द वित्तमोह दर्शविणारा आहे. वित्तमोहाने सत्यदर्शन लोपते, आणि मनुष्याकडून प्रमाद घडतो हा नित्याचा अनुभव आ

१६ व्या मंत्रात यम- सूर्य ही जोडदेवता आहे. इथे यम म्हणजे नियमन करणारा तर सूर्य प्रेरणा देणारा आहे (सु+ईर) वाईटापासून नियमन तर चांगल्याची प्रेरणा अभि आहे. व्यूह म्हणजे विश्लेषण तर समूह म्हणजे एकत्रीकरण उ १७ वा मंत्र देहाची अंतिम अवस्था दर्शवितो. या शरीराचे भस्म होणार आहे. परंतु केव्हा ? तर 'अथ' शब्दाने नंतर असा अर्थ सुचवला आहे. म्हणजे मानवी जीवनाचे अंतिम उद्दिष्ट आधी प्राप्त करावे. नरदेह हा साधन समजून त्याच्या योगाने कैवल्यमार्गावर चालावे आणि शेवटी ते शरीर भस्म होणार आहे याची जाणीव असू द्यावी. असा व्यावहारिक संदेश देताना अंतकाळी कृतज्ञतापूर्वक त्या परमेश्वराचे स्मरण करावे. यातील द्विरुक्ति ही समाप्तिसूचक आहे.

आणि अखेरच्या मंत्रात जीवनाचे सार्थक करण्यासाठी अग्निला प्रार्थना केली आहे. अग्नि हा जातवेदस आहे. त्याच्या सहभागाशिवाय या जगात कोणतीही निर्मिती शक्य नाही वयुन म्हणजे विणलेली असा अर्थ असला तरी इथे संदर्भा शरीर असा अर्थ घ्यायचा. ही शरीरे त्या अग्निमुळेच

© www.madhaveeraghuveer.com

अस्तित्वात आली. मातेच्या गर्भातील उब हे अग्निचेच रू
आहे. जन्मापासून मृत्युपर्यंत सर्वांना अग्निची साथ आहे.
आणि म्हणूनच आमच्याकडून कळत-नकळत घडणाऱ्या
पापांच्या अडथळा दूर करण्याचे काम अग्निवरच सोपवले
आहे. आमच्या उन्नतीच्या मार्गात या पापांमुळे बाधा ये
तेव्हा त्यांचे निवारण करण्यासाठी आम्ही विनम्रतेने पुन्हा पुन
तुला नमस्कार करत आहोत. अशी श्रद्धेने मागणी केली आहे

आपल्या वाट्याला आलेले हे आयुष्य निःस्वार्थवृत्तिने
आणि आनंदाने कसे जगता येईल, त्यामध्ये समाधानाची
पेरणी करत अगदी कृतार्थतेने मृत्युला सामोरे कसे जात
येईल. अनिष्ट गोष्टी टाकून या सृष्टीचक्राशी जुळवून घेता
घेता आपल्या जीवनाचा ताल आणि तोल कसा सांभाळत
येईल हे या उपनिषदातून आपल्याला समजते. आणि मनात
धारणा सकारात्मक झाली ना की मग खात्री पटते की
जीवन हे काही ओझे नाही; ती काही शोकांतिका नाही,
दुःखाचा देखील हसत हसत स्वीकार करता येतो. आणि
खरं सांगू का या अध्यात्ममार्गावरील आनंदयात्री होण्या
हे उपनिषद आमंत्रण देते. आणि नुसते आमंत्रणच नाही तर
आपला हात धरून सहजतेने कैवल्याच्या मुक्कामापर्यंत
घेऊन जाते.

शुभं भवतु।

माधवी रघुवीर जोशी
9373366611

© www.madhaveeraghuveer.com